# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

---

## प्रेसनोट

दिनांक २०/१०/२०२२

**‘‘ अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभागाने ०२ पिडीत मुलींकडुन जबरदस्तीने स्वतःचे आर्थिक फायदयासाठी वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या महिला दलालावरती कारवाई केलेबाबत. ’’**

मा. पोलीस आयुक्त श्री. अकुंश शिंदे, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय यांनी पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये वेश्या व्यवसाय करण्याच्या अनुषंगाने माहिती काढुन कारवाई करणेबाबत आदेश दिल्याने अनैतिक मानवी वाहतुक विभागाने पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत वेश्याव्यवसाय करण्याच्या अनुषंगाने गोपनिय माहिती काढत असताना दिनांक १९/१०/२०२२ रोजी रावेत पोलीस स्टेशन हद्दीत स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी अवैधरित्या मुलींकडुन वेश्याव्यवसाय करुन घेणा-या तसेच जास्त पैशाचे अमिष दाखवुन वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणा-या दलालावर कारवाई करण्यात आली आहे.

दिनांक १९/१०/२०२२ रोजी अनैतिक मानवी वाहतुक विभागातील पोलीस अधिकारी व पोलीस अमंलदार यांना रावेत पोलीस स्टेशन हद्दीत पुजा असे नाव सांगुन मोबाईल वरुन कॉल व व्हॉट्सअॅप कॉल करुन मुलींचे फोटो पाठवुन वेगवेगळया हॉटेल व लॉजेसवर मुलींना स्वत : घेवुन जावुन त्यातील एका मुलीची निवड करण्यास सांगुन वेश्याव्यवसाय करवुन घेते अशी माहिती मिळाली होती.

अशा मिळालेल्या माहितीवरुन रावेत हद्दीत बनावट ग्राहक पाचारण करुन हॉटेल मध्ये रुम बुक करुन सापळा रचला असता यातील महिला आरोपी पुजा हि तिचे सोबत दोन मुली घेवुन आली व त्यातील एक मुलींची वेश्यागमनाकरीता बनावट कस्टमर यास निवड करण्यास सांगुन त्याबदल्यात तिने स्वतः रक्कम स्विकारली असता अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध विभागातील पोलीस अधिकारी ,पोलीस अंमलदार व महिला पोलीस अंमलदार यांनी छापा टाकुन महिला आरोपी पुजा हिस ताब्यात घेवुन दोन पिडित मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका केली आहे. सदर पिडीत मुली हया ०१ नेपाळ व ०१ मुंबई येथील आहेत. महिला आरोपी पुजा हिचे ताब्यातुन व घटनास्थळावरुन जप्त केलेल्या मुद्देमालाचे वर्णन खालील प्रमाणे.

१) ३०००/- रु रोख रक्कम

२) ३० /- रु किं चे इतर साहित्य

३) ५,०००/- रु.कि.चा एक मोबाईल फोन जु.वा.कि.अं.

----------------------------------------------------------------

असा एकुण ८,०३०/- रु कि.चा.मुद्देमाल मिळुन आला म्हणुन १) पुजा उर्फ चंदा रामनरेश विश्वकर्मा वय-२५ वर्षे,रा.सध्या ओ पल इन हॉटेल,वडगांव शेरी पुणे मुळ रा.रामनरेश विश्वकर्मा,शिवशक्ती नगर,न्यु ३ लिंक रोड,मलिका अर्जुन जवळ,दहिसर ईस्ट,मुंबई हिचे विरुध्द रावेत पोलीस स्टेशन येथे गुरनं १०२/२०२२ भादवि कलम ३७० (३), सह अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला असुन पुढील तपास रावेत पोलीस स्टेशन करीत आहे.

सदरची कामगिरी मा.पोलीस आयुक्त श्री.अकुंश शिंदे सो, मा.अपर पोलीस आयुक्त श्री डॉ. संजय शिंदे सो, मा.पोलीस उप-आयुक्त, (गुन्हे), श्री. डॉ. काकासाहेब डोळे, सो., मा. सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) श्री. डॉ. प्रशांत अमृतकर, सो., यांच्या मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षातील पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र चव्हाण, पोउपनि विजय कांबळे, सुधा टोके, भगवंता मुठे, मारुती करचुंडे, गणेश कारोटे, वैष्णवी गावडे यांनी केली आहे.

**(डॉ. काकासाहेब डोळे)**
पोलीस उपायुक्त, (गुन्हे)
पिंपरी चिंचवड